SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 Stat Cell -0231-2609147.
Fax : 0091-231-2693294 website : www.unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष – ०२३१–२६०९१४७.
फॅक्स : ००९१–२३१–२६९३२९४. E-Mail : statcell@unishivaji.ac.in

"A"Re-accredited by NAAC (2014) with CGPA- 3.16

जा.क्र./शिवाजी. वि./सांख्यिकी कक्ष/ एमआयएस २०१५–१६/ 113

दिनांक : 30 SEP 2015

# परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

विषय :— माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHE-MIS) सन २०१५–१६ वेबपोर्टलवर माहिती भरणेबाबत........

संदर्भ :—१) क्रमांक उशिसं/सांख्यिकी/एम.आय.एस/२०१५–१६/९४८३, दिनांक २८/९/२०१५ चे मा. शिक्षण संचालक (उ.शि), पुणे यांचे पत्र.

२)जा.क्र. /शिवाजी. वि. /सांख्यिकी कक्ष/ एमआयएस २०१५–१६/९१, दिनांक २५/८/२०१५ चे परिपत्रक.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, व्यवस्थापन माहिती प्रणालीच्या माध्यमातुन ऑनलाईन पध्दतीने शैक्षणिक वर्ष सन २०१५–१६ मध्ये एमआयएस माहिती नोंदणीची सोय वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देवून महाविद्यालयाची माहिती वेबपोर्टलवर भरण्याबाबत संदर्भ क्रमांक २ च्या परिपत्रकाव्दारे कळविलेले होते. तरीही अद्याप माहिती वेबपोर्टलवर नोंदवलेली दिसून येत नाही. तरी संदर्भ क्रमांक १ च्या पत्राच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी शैक्षणिक व इतर बाबींची सन २०१५–१६ या वर्षाकरीता माहिती दिनांक १५/१०/२०१५ पर्यत www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टलवर तात्काळ भरावयाची आहे. **सदरची माहिती वेळेत न भरल्यास संपुर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या नोडल अधिकारी तथा प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.**

माहिती भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपण ०२३१–२६०९१४७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

कळावे.

आपला विश्वासू,

संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

## महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१

फोन क्रमांक ०२०/६५००१०१६/६५००११७३
वेब - www.dhepune.gov.in

फॅक्स क्रमांक ०२०/२६१२११५३
ई-मेल - stat.dhepune@nic.in

क्रमांक उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०१५-१६ /9483.

दिनांक - २८.९.२०१५ 28 SEP 2015

प्रति,
कुलसचिव,

१) मुंबई विदयापीठ, मुंबई
२) सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ, पुणे
३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद
४) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठ, नागपूर
५) स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड
६) उत्तर महाराष्ट्र विदयापीठ, जळगांव
७) कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविदयालय, रामटेक
८) संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ, अमरावती
९) शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर
१०) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विदयापीठ, मुंबई
११) गोंडवाना विदयापीठ, गडचिरोली
१२) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक
१३) डेक्क्न पुरातत्वशास्त्र संशोधन संस्था, येरवडा पुणे
१४) डॉ.डी.वाय.पाटील विदयापीठ, पिंपरी, पुणे
१५) भारती विदयापीठ, पुणे
१६) सोलापूर विदयापीठ, सोलापूर
१७) गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था, डेक्कन जिमखाना, पुणे
१८) टिळक महाराष्ट्र विदयापीठ, गुलटेकडी, पुणे

**विषय - व्यवस्थापकीय माहिती पध्दत (एम.आय.एस.) सन २०१५-१६**
वेबपोर्टलवर माहिती भरणे बाबत.

उच्च शिक्षण संचालनालयाने अधिपत्याखालील सहसंचालक कार्यालये, विदयापीठे आणि महाविदयालये यांचेकरीता प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींच्या ऑनलाईन माहिती नोंदणीकरीता www.dhemis.maharashtra.gov.in हे वेबपोर्टल विकसित केले आहे. सदरील वेबपोर्टलवर सन २०१३-१४ पासून ऑनलाईन स्वरुपात माहिती भरण्यात येते. सन २०१५-१६ करीता माहिती नोंदणीची लिंक उपलब्ध करण्यात आली असून त्यामध्ये सर्व अधिपत्याखालील विदयापीठांनी विविध शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती वेबपोर्टलवर नोंदवावयाची आहे. माहिती नोंदणीचा कार्यक्रम दिनांक १.१०.२०१५ पासून चालू होऊन दिनांक १५.१०.२०१५ पर्यंत शासन आदेशानुसार पूर्ण करावयाचा आहे व दिनांक १०.११.२०१५ पर्यंत एकत्रित अहवाल शासनाला सादर करावयाचा आहे.

२ विविध शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती संचालनालय, मंत्रालयीन विभाग आणि मंत्रिमहोदयांना वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येत असते. याअनुषंगाने वरील वेबपोर्टलवर आपल्या विदयापीठांनी शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती नोंदवून घेणे आवश्यक व अत्यंत गरजेचे आहे. सदरील कामाकरीता जबाबदार नोडल अधिका-याची नेमणूक करुन गतवर्षी प्रमाणेच सन २०१५-१६ ची सर्व प्रशासकीय बाबीची माहिती वरील कालावधीत वेबपोर्टलवर नोंदवून घेण्यात यावी.

३. विदयापीठाशी संलग्नित महाविदयालयांकडून माहिती वेबपोर्टलवर भरुन घेण्याची जबाबदारी विदयापीठाची आहे. या अनुषंगाने वरील मुदतीत माहिती भरुन घेण्याच्या कामाचे नियोजन करुन माहिती भरुन घेण्यात यावी. माहिती नोंदणीचे काम विहित मुदतीत पूर्ण होण्याच्या हेतूने महाविदयालयांतील कर्मचा-यांकरीता विदयापीठ स्तरावर AISHE आणि MIS कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे